झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
पहिला मजला, काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ,
शिवाजीनगर, पुणे-४११०१६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/२४८३/२०२६
दिनांक : ०८/०७/२०२६

झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश (अंतिम)

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश**

**प्रस्तावना -**

स.नं.१२ पै, सि.स.नं.३०५७ ते ३१४२ व ३१४३ ते ३१८९, आंबेडकरनगर, रिव्हर रोड, पिंपरी, पुणे अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

(१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि

(२) ज्याअर्थी, स.नं.१२ पै, सि.स.नं.३०५७ ते ३१४२, आंबेडकरनगर, रिव्हर रोड, पिंपरी, पुणे या क्षेत्रासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.१५/०३/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, मार्च २८ ते एप्रिल ३, २०२४ मध्ये पृष्ठ क्र.४, ५ व ६ वर तसेच दैनिक वृत्तपत्रात दि.१६/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.१८/०३/२०२४ रोजी डकवून प्रसिध्द करण्यात आली आहे ; आणि

(३) ज्याअर्थी, स.नं.१२ पै, सि.स.नं.३१४३ ते ३१८९, आंबेडकरनगर, रिव्हर रोड, पिंपरी, पुणे या क्षेत्रासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.११/१०/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर २८ ते डिसेंबर ०४, २०२४ मध्ये पृष्ठ क्र.३०, ३१ व ३२ वर तसेच दैनिक वृत्तपत्रात दि.१२/१०/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.२६/११/२०२४ रोजी डकवून प्रसिध्द करण्यात आली आहे ; आणि

(४) ज्याअर्थी, सदर पूर्वसूचनेची प्रत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना देखील देण्यात आली आहे. पूर्वसूचनेद्वारे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. सदरची पूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. अद्यापपर्यंत या कार्यालयाकडे जमीन मालक अथवा इतर कोणाचीही लेखी स्वरुपात हरकत/तक्रार प्राप्त झालेली नाही; आणि

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टीच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश :-**

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्या संदर्भातील दि.१५/०३/२०२४ व दि.११/१०/२०२४ रोजीची जाहिर नोटीस (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याची पूर्वसूचना) कायम करुन खालील

अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे एकत्रितपणे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करणे शक्य आहे.

**अनुसूची क्र.१**

**स्थलांतरणाने पुनर्वसन प्रस्तावित असलेल्या सध्याच्या झोपडपट्टीचे क्षेत्र**

झोपडपट्टीचे नाव :- स.नं.१२ पै, सि.स.नं.३०५७ ते ३१८९, आंबेडकरनगर, रिव्हर रोड, पिंपरी, पुणे

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा (मोजणी नकाशामध्ये नमुद केलेनुसार) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| आंबेडकर नगर | स.नं. १२पै, सि.स.नं.३०५७ ते ३१८९ | महाराष्ट्र सरकार | १५४६६.६४ चौ.मी. | रस्ता | सुभाषनगर ची हद्द | पवना नदी | सि.स.नं.३१९३ व नाला |

**अनुसूची क्र.२**

**स्थलांतरणाने पुनर्वसन ज्या ठिकाणी प्रस्तावित आहे ते क्षेत्र**

झोपडपट्टीचे नाव :- सि.स.नं.४६६३ पै, MIDC प्लॉट नं.RP १, पिंपरी औद्योगिक क्षेत्र, पिंपरी, जिल्हा- पुणे.

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| पिंपरी औद्योगिक क्षेत्र, पिंपरी, पुणे | सि.स.नं. ४६६३ पै, MIDC प्लॉट नं.RP-१ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (भाडेपट्टाधारक - मे. परफेक्ट ॲड्रेस एल.एल.पी.) | मोजणी नकाशाप्रमाणे १०४५३.३२ चौ.मी. झोनिंग प्रमाणे रस्ता बाधित क्षेत्र २११२.०० चौ.मी.वगळून उर्वरित क्षेत्र ८३४१.३२ चौ.मी. | रेल्वे लाईन | सि.स.नं. ४६६३ पै | रस्ता | रस्ता |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

दिनांक :- 08/07/२०२६.

8/7/2026

**(सतीशकुमार खडके)** (भा.प्र.से)

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**

**पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.**

प्रत-

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.- यांना माहितीस्तव.
२. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव.
३. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे- झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.